विद्यानिकेतन एज्युकेशन ट्रस्ट, लोणावळा संचालित ॲड. बापूसाहेब भोंडे हायस्कुल, भांगरवाडी, जि.पुणे या शाळेचे सर्व्हे नंबर ५४, भांगरवाडी, जि.पुणे येथे स्थलांतराबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्रमांकः माशास्थ ३३२४/प्र.क्र.४८३/२४ /एसएम-१**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक : १४ ऑगस्ट, २०२४

**वाचा :**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : माशास्थ ३३२१/प्र.क्र.४०१/एसएम-१ दिनांक २८ जुलै, २०२१.

**संदर्भ :**

विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे जा.क्र.शिउस/प्राथ/ २००२/ स्थलांतर/पुवि/२०२४-२०२५/६२९३, दि.२१.०६.२०२४ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना :-**

विद्यानिकेतन एज्युकेशन ट्रस्ट, लोणावळा संचालित ॲड. बापूसाहेब भोंडे हायस्कुल, भांगरवाडी, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे या इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक (इ. १ ते १० वी) शाळेचे सर्व्हे नं.५४, सिटी सर्व्हे नं.२०२/१ अ, भांगरवाडी, लोणावळा, ता. मावळ, जि.पुणे येथील स्थलांतरास कार्योत्तर मान्यता देण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त शाळेचे भौतिक सुविधा पूर्ण असलेल्या इमारतीत स्थलांतर केले आहे. त्यामुळे सदर शाळेचे वर नमूद ठिकाणी केलेल्या स्थलांतरास खालील अटी व शर्तीवर कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.:-

(१) स्थलांतरीत शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.

(२) सदर शाळा इंग्रजी माध्यमाची स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील असल्याने शाळेत कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे संपूर्ण दायित्व संस्थेवर राहील.

(३) शासनाकडून शाळा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ.संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ.चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.

(४) शाळेच्या बाबतीत मुळ शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाहीत

(५) भविष्यात शासन मान्यतेशिवाय शाळेचे स्थलांतर करण्यात येणार नाही, याबाबत संस्थेने दक्षता घ्यावी.

(६) सदर स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी सदर शाळेच्या स्थलांतराबाबत पुढील कार्यवाही १५ दिवसांत करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०८१४१९०२३८५६२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVIN RAJARAM MUNDHE

(प्रविण मुंढे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे, जि.पुणे
४. अध्यक्ष/ सचिव , विद्यानिकेतन एज्युकेशन ट्रस्ट, लोणावळा
५. निवडनस्ती (एसएम-१).

कायम विना अनुदान तत्वावर

जा.क्र.प्राशि/प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि/९७ — १८८१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक:- 31 MAR 1999

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पुणे विभाग पुणे/अ. नगर/रायगड.

प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका
प्राथमिक शिक्षण मंडळ सोलापूर/लोणावळा, जि. पुणे.

विषय:- सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत - माध्यम इंग्रजी

संदर्भ:- शासन शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र. एसएसएन/१०९८/[४५०] [/////] प्राशि-३ दि. २८ जानेवारी १९९९.

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील खाजगी प्राथमिक शाळांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन १९९८.९९ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे आपण तपासून घेऊन सोबतच्या विहीत नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयात सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झाले नंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे/न देणे या बाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

[१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी. किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
[illegible]

[२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

[४] संबंधीत संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत किंवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

[५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

[६] संस्थेने विहित नमुन्यात सुधारीत शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नाव, शाळेचे ठिकाण यात बदल नाही.

[७] शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

८] संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी आवश्यकतांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

[९] संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या निश्चित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

[१०] सक्षम अधिकाऱ्यांना संबंधित संस्थांना मान्यता देताना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करूनच मान्यता प्रदान करावी.

[११] सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. १० च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

[१२] शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही. याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. १० च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

[१३] संस्थेस ज्या वर्षी शाळा परवानगी द्यावयाची आहे, त्या वर्षी संस्थेने शाळा सुरु न केल्यास शाळेच्या नुतनीकरणासाठी अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील, अन्यथा शाळेस द्यावयाची परवानगी आपोआप रद्द करण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

वरील सर्व अटींच्या पूर्ततेचा अहवाल या कार्यालयात प्राप्त झालेनंतर पुढील आदेश निर्गमित केले जातील.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ करिता

प्रत,

१] मा. अवर सचिव,
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,
विस्तार भवन, मुंबई-३२ यांचेकडे माहितीस्तव सादर.

२] मा. शिक्षण संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
यांचेकडे माहितीसाठी सादर.

३] प्रती,
१] सचिव/अध्यक्ष
संबंधित संस्था नविद्या निकेतन एज्यु. ट्रस्ट, भांगरवाडी, लोणावळी; जि. पुणे.
२] सचिव, श्री. सार्थज्ञानपीठ सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे.
३] सचिव, अभिनव अभ्यासिका संगणक केंद्र, स. नं. १५, वडगांव बु. पुणे.
४] सचिव, स्व. महादेवराव चंदुलाल गेंगजी एज्यु. ट्रस्ट, १५६, मोरारजी पेठ, सोलापूर
५] सचिव, सेंट मेरीज कॉन्व्हेंट सोसा. निलिमा हॉटेलसमोर चिंढरे, ता. अलिबाग, रायगड.
६] सचिव, कोळपेवाडी ग्रामीण समाजसेवा संस्था, कोळपेवाडी, ता. कोपरगांव, अ. नगर.